# चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराचे तुलनात्मक अध्ययन

डॉ. गोविंदप्रसाद दा. दुबे
माजी अधिष्ठाता, (शिक्षण विद्याशाखा)
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर
माजी प्राचार्य, भगवंतराव बी.एड. कॉलेज, अहेरी, जिल्हा. गडचिरोली
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## १.० प्रस्तावना

शिक्षण हे नैसर्गिक व स्वयंस्फूर्त प्रक्रिया असुन जन्माला येणारा प्रत्येक व्यक्ती शिक्षणाच्या माध्यमातुन स्वत:ला येणाऱ्या अनुभवांच्या आधारे वर्तनात बदल करतो. ही क्रिया कळत न कळतपणे होत असते. शिक्षण हे केवळ शाळा अथवा महाविद्यालयापुरतेच मर्यादित नसते. तर ती जन्मापासून मृत्युपर्यंत चालणारी अखंड प्रक्रिया आहे. जन्म झाल्यावर सुरवातीच्या काळात मुल कुटुंबात व नंतर समाजात वावरतांना वेगवेगळे अनुभव घेतो. या काळात त्याचा शारीरिक भावनिक आणि क्रियात्मक पातळीवर विकास होत असतो (कुंडले, १९९६). एकंदरीत, शिक्षण हे जीवनाच्या सर्व क्षेत्राला एक भक्कम अधिष्ठान देणारे, उर्जा पुरविणारे एक शक्तीकेंद्र आहे असे मानण्यास हरकत नाही. विविध साहित्यीक तसेच समाजसुधारकांनी देखील शिक्षणाचा आग्रही प्रचार केला तो यामुळेचं कारण शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही.

शिक्षणाच्या काळातच मुलांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावल्या जातात व त्यांच्या चारित्र्याची जडणघडण होते. शीलसंवर्धन होते, नैतिक मूल्ये, नेतृत्व, राष्ट्रप्रेम व विश्वबंधुत्वाची भावना निर्माण होते. जबाबदारीची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण केली जाते. सामाजिक बांधिलकी व श्रमप्रतिष्ठेची जाणीवही याच शिक्षणातून निर्माण होते. परंतु, आज ज्ञान–विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षणाचे स्वरूप खूपच बदललेले आहे. मानवाने आपल्या सर्जनशील प्रतिभेतून शास्त्र, कला, साहित्य यांबाबत प्रगतीचे उच्च–शिखर गाठले आहे. परंतु आज मानवाने चंगळवादी प्रवृत्ती स्विकारली आहे व आज शिक्षणाला एका बाजारपेठेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. शिक्षणाच्या या बाजारपेठेत भारतातील शैक्षणिक संस्थांना शिक्षणाच्या माध्यमातुन भारतीय जीवनमूल्ये जिवंत राहतील याचीही काळजी घ्यावी लागणार (पवार, २००७).

या अनुशंगाने, शैक्षणिक आकांक्षा ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या आयुष्यात फार महत्वाची भूमिका बजावू शकते. किंबहुना, आधुनिक काळात शैक्षणिक आकांक्षा ही मानवी जीवनात अतिमहत्वाची गरज ठरू पाहते आहे. व्यक्तिला जीवनावश्यक असणाऱ्या गरजांची पूर्तता झाल्यानंतर त्याचे ध्येय हे व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक वा राजकीय प्रतिष्ठा व स्थान प्राप्त करणे हे असते. आणि हे स्थान प्राप्त करण्याकरिता तो जे प्रयत्न करतो, त्या प्रयत्नामध्ये कमी अधिक प्रमाणात यशा–अपयशांचा स्विकार करतो व आपल्या

महत्वकांक्षेला साकार करण्याचा प्रयत्न करतो. या सर्व प्रक्रियेतील विविध स्तरांना शैक्षणिक आकांक्षा म्हणता येईल. साधारणत:, विविध स्तरावरील व भागातील (ग्रामीण व शहरी भागातील) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षांचे स्वरूप हे वेगळे असते. या बाबींचा विचार करून प्रस्तुत संशोधनकार्यात चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याच्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला.

२.० संशोधनाची पद्धती व कार्यवाही

प्रस्तुत संशोधनकार्यात निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी प्रमाणिकृत संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला. संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

२.१ संशोधनाची व्याप्ती, मर्यादा व कार्यक्षेत्र

संशोधनाकरीता विदर्भाच्या चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण संपादन करीत असलेल्या पदवी स्तरातील विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित होते व संशोधनाचे कार्यक्षेत्र हे या दोन जिल्ह्यापूरते मर्यादित होते.

२.२ अध्ययन विश्व :

प्रस्तूत संशोधनकार्यात विदर्भाच्या चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हातील सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला.

२.३ जनसंख्या व नमुना निवड

या संशोधनकार्यात चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हातील सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सर्व पदवीस्तरावरील विद्यार्थी म्हणजे प्रस्तूत संशोधनाची जनसंख्या होय. नमुना निवडीच्या विभिन्न पद्धतीच्या गुणदोषाचा पूर्ण विचार करून प्रस्तूत संशोधनाकरीता ग्रामीण व शहरी भगातील विविध महाविद्यालयातुन यादृच्छिक पद्धतीने प्रत्येकी २०० विद्यार्थी याप्रमाणे एकुण ४०० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

२.४ संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण याकरीता वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा मिश्र संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली (जरारे, १९९५).

२.५ तथ्य संकलनाकरीता संशोधनाची साधने :

प्रस्तुत अध्ययनात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा या संदर्भात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. हि चाचणी संशोधनकर्त्यांने स्वत: निर्मित केलेली होती. तथ्य संकलन करण्याआधी या चाचणीचे विश्वसनियता व वैधता याचे परीक्षण करण्यात आले होते. याकरीता संशोधनकर्त्यांने २० उत्तरदात्यांवर या चाचणीचे प्रायोगिक तत्वावर परिक्षण केले. व या उत्तरदात्यांकडुन प्रश्नावली भरून घेण्यात आली. सहभागी झालेल्या या छोटया समूहावर सर्व तथ्य तपासण्यात आले आणि तपासात आढळलेल्या त्रुटी ओळखून प्रमाणित पद्धतीप्रमाणे त्यात सुधारणा करण्यात आल्या (बोधनकर व अलोनी, २००३).

२.६ दुय्यम स्त्रोत

तथ्य संकलनासाठी विविध दैनिक, साप्ताहिके, मासिके, वार्षिकांक, पुस्तके, ग्रंथ, नियतकालिके व इतर प्रकाशित साहित्यांचे अध्ययन करण्यात आले.

२.७ सांख्यिकीय विश्लेषण :

तथ्यांच्या विश्लेषणाकरीता सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राह्यता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला व त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व

बहुलक काढण्यात आले. संशोधनाचा आराखडा लक्षात घेता काई–वर्गमूल्य या सांख्यकीय परीक्षणाचा वापर करण्यात आला.

## ३.० माहितीचे विश्लेषण व सांख्यिकीय स्पष्टीकरण

### ३.१ विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर

सारणी क्रमांक १: पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तराची तुलना

| शैक्षणिक आकांक्षा स्तर | ग्रामीण भागातील विद्यार्थी | | शहरी भागातील विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | १०२ | ५१ | ४२ | २१ |
| मध्यम | ५८ | २९ | ९६ | ४८ |
| उच्च | ४० | २० | ६२ | ३१ |
| एकूण | २०० | १०० | २०० | १०० |

काई–वर्गमूल्य: ३०.५३२य स्वातंत्र्यांश: 2 ( **P** मूल्य = <0.05; तालिका मूल्य : ५.९९

वरिल सारणी क्र. १ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ५१ टक्के व शहरी भागातील २१ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर निम्न असून ग्रामीण भागातील २९ टक्के व शहरी भागातील ४८ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच ग्रामीण भागातील २० टक्के व शहरी भागातील ३१ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.२ शैक्षणिक आकांक्षा – शैक्षणिक कौशल्य/शैक्षणिक घटक

सारणी क्रमांक २: पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कौशल्य स्तराची तुलना

| शैक्षणिक कौशल्य – शैक्षणिक घटक | ग्रामीण भागातील विद्यार्थी | | शहरी भागातील विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | ८५ | ४२.५ | ७४ | ३७ |
| मध्यम | ६८ | ३४ | ८७ | ४३.५ |
| उच्च | ४७ | २३.५ | ३९ | १९.५ |
| एकूण | २०० | १०० | २०० | १०० |

काई–वर्गमूल्य: १०.८७६; स्वातंत्र्यांश: 2( **P** मूल्य = <0.05; तालिका मूल्य : ५.९९

वरिल सारणी क्र. २ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कौशल्य स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ४२.५ टक्के व शहरी भागातील ३७ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कौशल्य स्तर निम्न असून ग्रामीण भागातील ३४ टक्के व शहरी भागातील ४३.५ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कौशल्य स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच ग्रामीण भागातील २३.५ टक्के व शहरी भागातील ३९ टक्के विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कौशल्यस्तर उच्च असल्याचे निदर्शनास आले.

### ३.३ शैक्षणिक आकांक्षा – अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया व व्यावसायिक घटक

सारणी क्रमांक ३: पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया स्तराची तुलना

| | ग्रामीण भागातील विद्यार्थी | | शहरी भागातील विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | २३ | ११.५ | ४२ | २१ |
| मध्यम | १५८ | ७९ | १३० | ६५ |
| उच्च | १९ | ९.५ | २८ | १४ |
| एकूण | २०० | १०० | २०० | १०० |

काई–वर्गमूल्य: १८७.७९२; स्वातंत्र्यांश: 2( P मूल्यत्र <0.05; तालिका मूल्य : ५.९९

वरिल सारणी क्र. ३ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ११.५ टक्के व शहरी भागातील २१ टक्के विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया स्तर निम्न असून ग्रामीण भागातील ४९ टक्के व शहरी भागातील ६५ टक्के विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच ग्रामीण भागातील ९.५ टक्के व शहरी भागातील १४ टक्के विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया स्तर उच्च असल्याचे निर्दर्शनास आले.

३.४ शैक्षणिक आकांक्षा – व्यावसायिक ज्ञान

सारणी क्रमांक ४: पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा व्यावसायिक ज्ञान स्तराची तुलना

| | ग्रामीण भागातील विद्यार्थी | | शहरी भागातील विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | ६६ | ३३ | २७ | १३.५ |
| मध्यम | ८७ | ४३.५ | ४८ | २४ |
| उच्च | ४७ | २३.५ | १२५ | ६२.५ |
| एकूण | २०० | १०० | २०० | १०० |

काई–वर्गमूल्य: १२.००९; स्वातंत्र्यांश: 2( P मूल्य = <0.05; तालिका मूल्य : ५.९९

वरिल सारणी क्र. ४ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक ज्ञान स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ३३ टक्के व शहरी भागातील १३.५ टक्के विद्यार्थ्यांचा व्यावसायिक ज्ञान स्तर निम्न असून ग्रामीण भागातील ४३.५ टक्के व शहरी भागातील २४ टक्के विद्यार्थ्यांचा व्यावसायिक ज्ञान स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच ग्रामीण भागातील २३.५ टक्के व शहरी भागातील ६२.५ टक्के विद्यार्थ्यांचा व्यावसायिक ज्ञान स्तर उच्च असल्याचे निर्दर्शनास आले.

३.५ शैक्षणिक आकांक्षा – नैतिकता घटक

सारणी क्रमांक ५: पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा नैतिकता घटकाच्या स्तराची तुलना

| | ग्रामीण भागातील विद्यार्थी | | शहरी भागातील विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| निम्न | ८४ | ४२ | १०२ | ५१ |
| मध्यम | ६४ | ३२ | ६१ | ३०.५ |
| उच्च | ५२ | २६ | ३७ | १८.५ |
| एकूण | २०० | १०० | २०० | १०० |

काई–वर्गमूल्य: ७.८४५; स्वातंत्र्यांश: 2( P मूल्य = <0.05; तालिका मूल्य : ५.९९

वरिल सारणी क्र. ५ मध्ये अध्ययन क्षेत्रातील पदवी स्तरावरील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या नैतिकता घटकाच्या स्तराची माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ग्रामीण भागातील ४२ टक्के व शहरी भागातील ५१ टक्के विद्यार्थ्यांचा नैतिकता घटकाचा स्तर निम्न असून ग्रामीण भागातील ३२ टक्के व शहरी भागातील ३०.५ टक्के विद्यार्थ्यांचा नैतिकता घटकाचा स्तर मध्यम असल्याचे आढळले. तसेच ग्रामीण भागातील २६ टक्के व शहरी भागातील १८.५ टक्के विद्यार्थ्यांचा नैतिकता घटकाचा स्तर उच्च असल्याचे निर्दर्शनास आले.

४.० निष्कर्ष

४.१ शैक्षणिक आकांक्षा

- संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर निम्न असून शहरी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आकांक्षा स्तर मध्यम स्वरूपाचा आहे.

४.२ शैक्षणिक कौशल्य – शैक्षणिक घटक

- संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कौशल्य स्तर निम्न असून शहरी भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक कौशल्य स्तर मध्यम स्वरूपाचा आहे.

४.३ अभ्यासक्रमा व्यतिरिक्त क्रिया– व्यावसायिक घटक

- संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की ग्रामीण व शहरी भागातील बहुतांश विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त क्रिया स्तर मध्यम स्वरूपाचा आहे.

४.४ व्यावसायिक ज्ञान– व्यावसायिक घटक

- संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की ग्रामीण भागातील बहुतांश विद्यार्थ्यांचा व्यावसायिक ज्ञान स्तर मध्यम असून व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा व्यावसायिक ज्ञान स्तर उच्च स्वरूपाचा आहे.

४.५ नैतिकता घटक

- संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांचा नैतिकता घटकाचा स्तर उच्च स्वरूपाचा आहे.

५.० संदर्भ सुची

1. कुंडले, म.बा., शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, २५० शनिवारपेठ, पुणे ३०, १९९६, पृ. २५०, ४०९.
2. पवार, ना.ग., मूल्यशिक्षण: आजच्या संदर्भात, नित्यनूतन प्रकाशन, पुणे, २००७, पृ. क्र. ९७.
3. घाटोळे रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००९–१०.पृ.क्र. १ ते २३.
4. बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००३:८९
5. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९७६:१४७.
6. जरारे विजय, संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, १९९५:७९
7. बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३:१४७.
8. वर्मा ओमप्रकाश, सामाजिक अनुसंधान की विधियाँ, ग्रन्युत प्रिग्टिंग प्रेस सांकेत नगर, कानपूर, १९८७:३३५